**"फाईल कव्हर, फाईल बोर्ड व केस बोर्ड"**
**दरनिश्चितीस मुदतवाढ**

**महाराष्ट्र शासन**
**उद्योग संचालनालय,**
**नवीन प्रशासन भवन, मध्यवर्ती भांडार खरेदी संघटना, मुंबई-४०० ०३२.**

आदेश क्रमांक उसं/अंध अपंग/२०१२-१३/दरनिश्चितीस/मुदतवाढ/(३८)/२०१५/ बी-१७५०
-3 MAR 2016

**वाचा** १. शासन निर्णय,उद्योग,ऊर्जा व कामगार विभाग क्रं.भांखस/१०८८/२५१२/उ-६,दि.०२/११/१९९२
२. उद्योग संचालनालयाचे परिपत्रक क्रं.उसं/भांखस/फाईल कव्हर, फाईल बोर्ड व केस बोर्ड/ दरनिश्चिती/(२६)/ २०१२-२०१३/बी-१४३६१, दिनांक ०५/१०/२०१२
३. उद्योग,ऊर्जा व कामगार विभागाचे पत्र क्रं.भांखस-२०१४/प्र.क्र.८३/उद्योग-४,दि.०१/१२/२०१५
४. उद्योग संचालनालयाचे आदेश क्र. उसं/अंध अपंग/२०१२-१३/दरनिश्चितीस/मुदतवाढ/(३८)/ २०१५/ बी-१३२९४, दि.०७/१२/२०१५
५. उद्योग,ऊर्जा व कामगार विभागाचे ज्ञापन क्र.भांखस-२०१६/प्र.क्र५४/उद्योग-४दि.२४/०२/२०१६

उद्योग संचालनालयाने अंध व अपंग यांच्या धर्मादाय संस्थांना सन २०१२-२०१३ साठी शासकीय विभागांना "फाईल कव्हर, फाईल बोर्ड व केस बोर्ड" करण्यासाठी परिपत्रक क्रं.उसं/ भांखस/ फाईल कव्हर, फाईल बोर्ड व केस बोर्ड/दरनिश्चिती/(२६)/ २०१२-२०१३/बी-१४३६१, दिनांक ०५/१०/२०१२ नुसार दरनिश्चिती दिली होती.

ज्याअर्थी, शासनाने उपरोक्त संदर्भ क्र.३ अन्वये सन २०१२-२०१३ च्या दरनिश्चितीस दि.३१/१२/२०१५ पर्यंत मुदतवाढ देण्याचे आदेशित केले होते. आता, उपरोक्त संदर्भ क्रं.५ अन्वये शासनाने पुन्हा सन २०१२-२०१३ च्या दरनिश्चितीस दिनांक ३०/०६/२०१६ किंवा सुधारित दरनिश्चिती होईपर्यंत, यापैकी जे अगोदर घडेल तोपर्यंत मुदतवाढ देण्याचे आदेशित केले आहे.

त्याअर्थी, शासकीय कार्यालयांना "फाईल कव्हर, फाईल बोर्ड व केस बोर्ड" पुरविण्यासाठी अंध व अपंग यांच्या संस्थांना सोबत जोडलेल्या सन २०१२-२०१३ च्या दरसूची नुसार "फाईल कव्हर, फाईल बोर्ड व केस बोर्ड" या दरनिश्चितीमध्ये कोणतीही वाढ न करता दरनिश्चितीस दि.३०/०६/२०१६ किंवा सुधारित दरनिश्चिती होईपर्यंत, यापैकी जे अगोदर घडेल तोपर्यंत मुदतवाढ देण्यात येत आहे. सदर दरनिश्चिती पत्रकातील दर व अटीमध्ये कोणताही बदल करण्यात आलेला नाही.

**उद्योग सह संचालक (भां.ख.)**
**विकास आयुक्त (उद्योग) यांचेकरिता,**

प्रति,
१) मे. प्रेरणा ट्रस्ट, औरंगाबाद, सुभेदारी गेस्ट हाऊस समोर, रंगीन दरवाजाजवळ, औरंगाबाद
२) कक्ष अधिकारी (उद्योग-४), उद्योग,ऊर्जा व कामगार विभाग, मंत्रालय, मुंबई ३२

D:\अंध व अपंग\अंध व अपंग मुदतवाढ.docx

"फाइल कव्हर, फाईल बोर्ड व केस बोर्ड"
या बाबी करीता दरनिश्चिती.

# महाराष्ट्र शासन

**उद्योग संचालनालय,**
**नवीन प्रशासन भवन, मध्यवर्ती भांडार खरेदी संघटना, मुंबई - ४०० ०३२.**
**परिपत्रक क्रमांक उसं/भांखसं/फाईल कव्हर, फाईल बोर्ड व केस बोर्ड/दर निश्चिती/(२६)/२०१२-२०१३/बी १४३८९ दिनांक :- 5 OCT 2012**

वाचा
१ **शासन निर्णय उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग क्र. भांखसं/१०८८/२५१२/उ-६, दिनांक ०२/०१/१९९२.**
२ **उद्योग,ऊर्जा व कामगार विभागाचे पत्र क्र.भाखसं-१०९५/२७२८/उद्योग-६,दि.१९/६/१९९६**
३ **उद्योग, ऊर्जा व कामगार विभागाचे पत्र क्र. भांखस-२००१/(२९४७)/उ-६,दि.४/८/२००३**
४ **भांडार खरेदी समिती निर्णय क्र.११,दि.२७/९/२०१२.**

शासन निर्णय उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग क्र. भांखस/१०८८/२५१२/उ-६, दि.०२/०१/१९९२ च्या परिशिष्ट- पाचमध्ये शासनाचे अंगीकृत व्यवसायांकडून खरेदी करण्यासाठी आरक्षित केलेल्या विविध वस्तूंची यादी देण्यात आली आहे. याच शासन निर्णयातील परिच्छेद ७ नुसार संबंधित संस्थांकडून पुरवठा करण्यात येणाऱ्या वस्तूंची किंमत ठरविण्याचे अधिकार मध्यवर्ती भांडार खरेदी संघटनेच्या भांडार खरेदी समितीकडे सोपविण्यात आले आहेत. तसेच शासन निर्णय उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग क्र. भांखसं/१०८८/२५१२/उ-६, दिनांक ०२/०१/१९९२ मध्ये मे. महाराष्ट्र राज्य खादी व ग्रामोद्योग मंडळ, मुंबई व उद्योग, ऊर्जा व कामगार विभागाचे पत्र क्र. भांखस-२००१/(२९४७)/उद्योग-६, दिनांक ०४/०८/२००३ नुसार मे. प्रेरणा ट्रस्ट औरंगाबाद, सुभेदारी गेस्ट हाऊस समोर, रंगीन दरवाजा जवळ, औरंगाबाद यांना **"फाइल कव्हर, फाईल बोर्ड व केस बोर्ड, फोल्डर फाईल"** या बाबीकरिता आरक्षण देण्यांत आलेले आहे.

मध्यवर्ती भांडार खरेदी संघटनेने दिनांक २७/०९/२०१२ रोजी झालेल्या बैठकीत घेतलेल्या निर्णयानुसार मे. महाराष्ट्र राज्य खादी व ग्रामोद्योग मंडळ, मुंबई व मे. प्रेरणा ट्रस्ट औरंगाबाद, सुभेदारी गेस्ट हाऊस समोर, रंगीन दरवाजा जवळ, औरंगाबाद यांचे खाली दर्शविलेल्या तक्त्याप्रमाणे दर निश्चित केले आहेत.

| अ.क्र. | बाब | विनिर्देश | दर प्रत्यंकी |
|---|---|---|---|
| १. | **File Covers** | File Covers as per (Sectt.)<br>24 BM Board duly printed with clothing (4" x14") inside and outside cloth duly punched leaving a distance of 3" between two punched holes these hiles should be in the entry of the Board.<br>२४ X ३६ सें.मी. (बाब क्र. २४ बीएम)<br>२८० जीएसएम आणि किमान चिंधीचे प्रमाण ५० टक्के. | **Rs. 08. 60** |

| | | | |
|---|---|---|---|
| २. | **File Board** | Pairs of file Board (Item No. S. 214) over all size 37 x 24 cms. to be manufactured as that used for case board i.e. 91 DKG of 1887 GSM specification.<br>a) Eyelets used should be superior metal and should be of 0/1 variety.<br>b) Straw Boards pienes of (1) 37 x 20 cms. (2) 37 x3 cms.<br>c) Binding clothes 37 x 10 cms. It should have 60 ends and 48 Picks per 2.54 cms. and should have a weight of 0.25 kg. per d sq.metre.<br>d) Paper in the size 35.5 x 19 cms. 90 GSM. | **Rs. 16.70**<br>**( 2 pieces)** |
| ३. | **Case Board** | Case Board ( Item No. d. 215_) Size 24 cms. & 36 cms. ( to be manufactured from specification)<br>**a)** 91 DKG straw Board of 1887 GSM and size 61 x 86 cms. as per Grade A.<br>**b)** Strong while ape having a length of 98.5 cm and width of 1.25 cm. It should have a good selage. It should have wrap of 2/20 and wett. of 2/10 with 48 ends 22 picks per 25.4.cm.<br>**c)** Superior binding cloth in the size 61 x 10 cm. It should be suitably strengthened by pecting catridge paper on the rough side. It should have 60 ends and 48 picks per 2.54 mm. and should have a weight of 0.23 kg.per sq.metre.<br>**d)** While catridge in the size 61 x 10 cm. 100 GSM.<br>e) Paper in the size 35.5 x 23.5 cms. 10 GSM. | **Rs. 12.00** |

शासनाचे अंगीकृत महामंडळ/मंडळ यांनी त्यांचेकडे नोंदणीकृत उत्पादक संस्था/सभासद व मंडळांची/महामंडळानी तसेच सहकारी संस्था व इतर संस्था स्वतःच उत्पादन केलेल्या वस्तूंचे शासकीय कार्यालयांना पुरवठा करावा व महामंडळांनी "बाजारातून वस्तू विकत घेवून शासनास पुरवठा करु नये."

**टिप :-** १) केंद्र शासनाच्या धोरणानुसार 'फोल्डर' ही बाब लघु उद्योगांकडून खरेदी करण्यासाठी राखीव आहे. त्यामुळे महाराष्ट्र खादी ग्रामोद्योग मंडळाने सदर बाबीची खरेदी महाराष्ट्रातील लघु उद्योजक जे उद्योग संचालनालयाकडे स्थायी नोंदणीकृत आहेत, अशांकडूनच करावी.

२) वरील बाबींकरीता लागणारा हात कागद (कच्चा माल) महाराष्ट्रातील उद्योगांकडून खरेदी करण्यात यावा. याबाबतचे संनियत्रंण महाराष्ट्र खादी ग्रामोद्योग मंडळाने करावे.

वरील तक्त्यात दर्शविलेले दर हे **दिनांक ३० जून, २०१३** पर्यंत ग्राहय राहतील. सदर दर हे सर्व कर समाविष्टीत असे असून, खरेदीदाराच्या कार्यालयापर्यंत मोफत पोहोच असे आहेत.

शासनाचे पत्र क्र. केव्हीबी - १०९६/(६५६२)/ उद्योग- ६, दि. १७/७/९६ मधील सूचनांचे पालन महाराष्ट्र खादी ग्रामोद्योग मंडळ व शासकीय मुद्रण व लेखन सामग्री संचालनालय, मुंबई यांनी करावयाचे आहेत. पुरवठा पुर्व तपासणी संचालक, शासकीय मुद्रण व लेखन सामग्री संचालनालय, वा त्यांनी प्राधिकृत केलेल्या अधिकाऱ्यांकडून करुन घेणे आवश्यक आहे.

**पुरवठा कालावधी:-** मागणीपत्र मिळाल्यापासून ६ आठवडयाच्या आत मालाचा पुरवठा करणे आवश्यक आहे.

**देय रक्कमेबाबतच्या अटी :-** मागणीकार कार्यालयास माल विनिर्देशानुसार व विहित गुणवत्तेचे प्राप्त झाल्यानंतर ९०% रक्कम २ आठवडयामध्ये द्यावयाची आहे व उर्वरित १०% रक्कम सर्व मालाची पोच सुस्थितीत व विनिर्देश प्रमाणे झाल्यानंतर ३० दिवसापर्यंत देणे आवश्यक आहे. पुरवठा कालावधीमध्ये मालाचा पुरवठा न झाल्यास उशीरा पुरवठा केलेल्या मालाच्या किंमतीवर ½% प्रती आठवडा प्रमाणे दंड मागणीकार कार्यालयामार्फत आकारला जाईल व त्याची कमाल मर्यादा खालीलप्रमाणे असेल.

(अ) पुरवठा कालावधीमध्ये पुरवठा न केलेल्या मालाची किंमत एक लाखापेक्षा कमी असेल तर अशा किंमतीच्या १० % टक्के दंड आकारला जाईल.

(ब) पुरवठा कालावधीमध्ये पुरवठा न केलेल्या मालांची किंमत एक लाखापेक्षा जास्त असेल तर अशा किंमतीच्या ५ % टक्के दंड आकारला जाईल.

सदरील दंडाची वसूली करण्याची संपूर्ण जबाबदारी मागणीकाराची असेल. पुरवठा होणाऱ्या मालाची/वस्तूची गुणवत्तेबाबतची तपासणी मागणीकार कार्यालयाने आवश्यकतेनुसार करावी.

**उद्योग सह संचालक ( भां.ख.)**
**विकास आयुक्त (उद्योग) यांचेकरिता.**

**प्रति,**

१) महाराष्ट्र राज्य खादी व ग्रामोद्योग मंडळ, १९/२१, मनोहरदास रस्ता, फोर्ट, मुंबई - ४०० ००१. दूरध्वनी क्रमांक -२२६१ ७६४१/४२/४३

२) मे. प्रेरणा ट्रस्ट औरंगाबाद, सुभेदारी गेस्ट हाऊस समोर, रंगीन दरवाजा जवळ, औरंगाबाद-४३१ ००१. दूरध्वनी क्रमांक - (०२४०) २३५३३११.

३) संचालक, शासकीय मुद्रण व लेखन सामग्री संचालनालय, चर्नी रोड स्टेशन जवळ, नेताजी सुभाष मार्ग, मुंबई- ४०० ००४ यांना माहितीस्तव सादर.